# नवविधा भक्ती

२४

प्रेम न ये सांगता बोलता दावीता ।
अनुभवे चित्ता चित्त जाणे ।

संत तुकाराम महाराज.

भक्ती म्हणजे परमात्म्याविषयी अपरंपार प्रेम !! मनात फक्त परमेश्वराचाच विचार, डोळ्यांचा विषयही परमेश्वराचीच मूर्ती, कानांचा विषय हरिकथेचे श्रवण, मुखाने हरिनामाचे उच्चारण. एकुण काय सर्वत्र श्रीहरीचाच प्रत्यय येणे. मनाला, बुद्धीला श्रीहरीचाच ध्यास लागणे होय. जे काम करायचे ते श्रीहरीचे काम म्हणून करायचे. हे कसे घडणार ? तर श्रीमद् भागवतात भक्ती कशी करायची हे सांगितले आहे. प्रत्येक प्रकारच्या भक्तीचे आदर्श कोण हे सुद्धा सांगितले. भक्ती नऊ प्रकारे करता येते. तिला नवविधा भक्ती म्हटले आहे.

" श्रवणं कीर्तनं विष्णोस्मरणम् पादसेवनम् ।
अर्चनं, वंदनं, दास्यं, सख्यम, आत्मनिवेदनम् ॥

प्रत्येक प्रकार हा आपापल्या परीने श्रेष्ठ आणि निश्चित फल पर्यवसायी म्हणजेच मोक्षपद देण्यास समर्थ आहे. एका प्रकारचे अनुष्ठान करणाऱ्या भक्ताने दुसऱ्या प्रकारची भक्ती करूच नये असे मात्र नाही.

## (१) श्रवणभक्ती

परीक्षितराजाने एकदा आपल्या घरातील मौल्यवान वस्तू म्हणून पूर्वजोपार्जित असलेला मुकुट मस्तकी धारण केला. त्याला मृगयेला जाण्याची इच्छा झाली. तो एकटाच वनात गेला, खूप हिंडला, दमला. त्याला एक पर्णकुटी दिसली. पाणी तरी प्यायला मिळेल म्हणून तो आत गेला, कुटीत कोणीच नव्हते. कोपऱ्यात एका ऋषीची समाधी लागलेली दिसली. आपल्याला कोणीच या म्हणत नाही, आदरसत्कार नाही, हे राजास आवडले नाही, कुटीत कोणीच दिसत नाही तेव्हा कोण विचारणार हे ही त्याच्या लक्षात आले नाही, त्याला राग आला. रागाने तो बाहेर जात असतांना एक मेलेला साप त्याला दिसला. बाणाच्या टोकाने त्याने तो साप शमिक ऋषींच्या गळ्यात घातला; व नगराच्या दिशेने निघाला.

शमिकऋषिनंदन शृंग हा बाहेर खेळायला गेला होता. परत आल्यावर त्याला वडिलांच्या गळ्यात साप दिसला. त्याला वाटले आपले वडील मृत झाले; पण राजाने केलेली कृती समोरून एकले

पाहिली होती. ती त्याने शृंगास सांगितली. आपल्या पित्याच्या मृत्युस राजाच जबाबदार आहे असे मानून तो नदीवर गेला; स्नान करून शुचिर्भूत होवून हातात पाणी घेतले. आणि आपल्या तेजस्वी वाणीने शाप दिला - 'ज्या कुलांगार राजाने माझ्या पित्याला अपमानित केले त्याला आजपासून सातव्या दिवशी तक्षक सर्पदंश करेल आणि राजाला मृत्यु येईल'. त्यानंतर आश्रमात तो परतला आणि दुःख करू लागला; तेवढ्यात ऋषींची समाधी भंगली; त्यांना सगळा वृत्तांत समजला; त्यांनी शृंगीलाच राजाकडे शापवाणी सांगावयास पाठवले.

ईकडे परीक्षिती प्रासादात आल्यावर त्याने आपल्या मस्तकावरील मुकूट काढला आणि आपली चूक त्याच्या लक्षात आली; तेवढ्यात ऋषीकुमार शृंगी प्रासादात आला, आणि आपली शापवाणी त्याने सांगितली. शाप भोगल्यावर पाप क्षालन होईल म्हणून राजाने ती शापवाणी स्विकारली. मिळालेल्या सात दिवसांचा सदुपयोग करण्याचे ठरवले. गंगाकिनारी जावून तो श्रीकृष्णाचे ध्यान करु लागला. शापवाणी समजताच अन्य ऋषी त्याला भेटायला येवू लागले. व्यासपुत्र शुकमुनींना राजाने विचारले की; स्वर्गीचे अमृतपान करणे व श्रीकृष्णकथामृत श्रवण करणे यात फरक कोणता? यामध्ये काय श्रेष्ठ? तेव्हा शुकमुनी म्हणाले स्वर्गीचे अमृत दुःख मिश्रीत आहे. पुण्य सिरेल पण पाप क्षय होणार नाही. पण श्रीकृष्ण कथामृत श्रेष्ठ व आदरणीय आहे, आनंददायी आहे. त्याने काळाचे भय उरत नाही. मन शुध्द व पवित्र होते. असे म्हणून त्यांनीच राजाला श्रीकृष्णकथामृत ~~श्रवण केले~~ सांगितले. राजा स्वशरीरेच परमेश्वराचा लाडका भक्त बनला.

② कीर्तन भक्ती.

श्रीहरीचे कीर्तन करणे ही फार जूनी परंपरा आहे. कीर्तनकार समाजधारणेचे व त्यास उपयुक्त अशा ईश्वरनिष्ठा, धर्मनिष्ठा; नैतिकता; कृतज्ञता, परस्पर विश्वासार्हता इ. दैवी गुणसंपदा समाजात दिमाखात नांदेल अशी समाज स्थिती निर्माण करण्याचे पवित्र कार्य अव्याहत व अखंड करीत असतात. श्री नारदमुनी हे हरीकीर्तन या महामंत्राचे द्रष्टे ऋषीच आहेत, महर्षी नारद, शुकयोगिंद्र, असीत, देवल, व्यासप्रभृती भगवतकथा सांगत असत. त्यातूनच श्रीहरीच्या नामाची गोडी सर्वांना लागत असत. मानवी जीवन आनंदी व परिपूर्ण बनवणे हे कीर्तनाचे उद्दिष्ट होते. भौतिक

प्रगतीतून सुखसोयी मिळतात पण मानसिक शांती ही दैवी गुणांच्या उत्कर्षातून मिळते. संत तुकाराम महाराजा, संत गाडगे महाराजांच्या कीर्तन शैलयाची वर्णने प्रसिद्ध आहे. वारकरी कीर्तन आणि हरदासी कीर्तन अशा कीर्तनाच्या दोन पध्दती आहेत. श्री एकनाथ महाराजांनी कीर्तनाचे नियम तयार केले, ते आजही पाळले जातात. समाज जागृतीचे समाज शिक्षणाचे हे एक प्रभावी माध्यम आहे

(३) स्मरणभक्ती

ज्या परब्रह्म स्वरुपाची भक्ती करायची तो सच्चितानंद स्वरुप आहे. यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य या सहा गुणांनी संपन्न आहे. म्हणून त्याचे नित्य स्मरण करावे. भक्त प्रल्हाद हे या भक्तीचे प्रतिक आहे. स्मरण म्हणजे आठवण / चिंतन. प्रत्येक साधनेचा अवलंब मनापासून व्हावा लागतो. तसेच तो फलदायी होतो. माणसास मरण समयी जे आठवते त्यास ती गती प्राप्त होते. सतत स्मरण केल्याने काय घडते ते परमेश्वर स्वतःच सांगत आहे

'तिन्ही जे वेळी मी स्मरावा ।
ते वेळी स्मरता की पावावा ।
तो आभारही जीवा । साहवेना ॥
ते ऋणवैपण देखोनि अंगी ।
मी अपुलेयाचि उत्तीर्णत्वालागी ।
भक्तांचिया तनुत्यागी । परिचर्या करी ॥

(४) पादसेवन भक्ती

या भक्तीची आदर्श श्री लक्ष्मीदेवी आहे. ती नेहमीच श्रीविष्णूंचे पाय चेपत आहे असे आपण मानतो

'लक्ष्मी ते मुख्य नायिका । मग सर्वस्वे करुनि सेवा ।
अभिमानू सांडूनि पांडवा । ते पाय धुवावयाचिया देवा । पात्र जाहली ॥

तसेच परमेश्वर स्वरुप सद्‌गुरुची सेवा

'तनु मनु जीवे । चरणासि लागावे ।
अगर्वता करावे । दास्य सकळ ॥

अशी करावी. यात मुख्यता अगर्वता आणि अभिमान सोडून याला महत्व आहे. देहाने, मनाने गुरुंच्या चरणांना वंदन करावे. यात मूर्तिपूजा करणे, पुजोपचार जमा करणे, गुरुगृहाची, अंगणाची स्वच्छता करणे,

सडा- रांगोळी करणे इ. गोष्टी येतात.

तूज मागणे ते देवा / आम्हा घडावी तुझी चरणसेवा ॥

## ५ अर्चन भक्ती

अर्च म्हणजे पूजायाम् - पूजा करणे. देवाची पूजा करण्याला अर्चन भक्ती म्हणतात. पुराण काळापासून रामकृष्णादी देवांच्या पूजेची सुरवात झाली या मूर्तीपूजेचा उपयोग सगुणातून निर्गुण निराकार परमेश्वरापर्यंत म्हणजे परब्रह्माचे ज्ञान करून घ्यायचे असते. परम प्रीती असल्याशिवाय परब्रह्माचा साक्षात्कारही होत नाही. मूर्ती मातीची कींवा धातूची करतात. देव, ब्राह्मण, आई, वडील, श्रीगुरु, विद्वान यांचे पूजन हे अर्चना भक्तीचे स्वरुप आहे. मानस पूजा ही सुध्दा अर्चन भक्ती होय. शब्दांचा / वाणीचा / वक्तृत्वाचा विषय देव होतो. शब्दांना सामर्थ्य प्राप्त होते. देवमूर्तीचे अर्चन करतांना चित्तात सात्विकता असली पाहीजे. फळ, फुल, पान, अर्घ्य असे काहीही देवाला चालते पण त्या अर्पण करण्यात निस्सीम भाव असायला हवा.

## ६ वंदन भक्ती

आपापल्या प्रिय देवतेला वंदन करणे / नमस्कार करणे या भक्तीमध्ये विनय कींवा नम्रता हा प्रधान भाव आहे. देहदृष्टीने साष्टांग नमस्कार करणे ही वंदन भक्ती होय. साष्टांग म्हणजे अष्टांगे भूमीवर टेकवून (दोन हात, दोन पाय, दोन गुडघे, उर-छाती, मस्तक ही अष्टांगे होत) नमस्कार करणे होय. दंडवत नमस्कार म्हणजे शिवलींग कींवा विष्णुप्रतिमा डोळ्याने पाहताक्षणीच काठी जशी भूमीवर पडते त्याप्रमाणे देह भूमीवर चार्जित होवून पडावा. विनय हीच भक्तांची खरी संपत्ती असते. वंदन भक्तीमुळे मानापमान वृत्ती गळून पडते हे या भक्तीचे वर्म आहे.

## ७ दास्य भक्ती

परमेश्वराची कींवा गुरुची सेवा करावयास मिळाली तर उत्तमच. निष्काम सेवा करायची, त्याच्या आज्ञेचे पालन करायचे यातच आयुष्य समर्पित करायचे व धन्यता मानायची ही दास्य भक्ती होय.

सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण /
जोवरी प्राण हा प्राण जाय त्याचा ॥

आपल्याला जे काम करावे लागते ते आपणच करावे अशी परमेश्वराची

(२८)

Date: / ५ /

Page No.:

इच्छा आहे असे मानून ते काम करावे. दास्य भक्तीचे आदर्श परमश्रेष्ठ श्री हनुमंतराय आहेत.

⑧ सख्य भक्ती

अर्जुन हा सख्य भक्तीचा आदर्श आहे. परमेश्वराची निष्काम सेवा / उपासना केल्याने, त्याचे भक्ताविषयीचे प्रेम वाढल्यामुळे आपोआपच त्याच्या विषयी प्रेम वाटीस लागते. जिवाभावाचे मैत्र म्हणजे सख्य भक्ती. परमेश्वर अर्जुनाशी बोलले आणि त्या अमृतवाणीचा लाभ आपल्यालाही झाला. भक्तावर कृपा करून देवाने सर्व जगाला गीतामृत दिले. मुळात परमेश्वराचे प्रेम मिळाले की तो काय वाटेल ते देतो. तो ही प्रेम करतो. पण त्यासाठी आपल्याला अर्जुन होता आले पाहिजे.

⑨ आत्मनिवेदन

मानवी जीवनात अंतीम शरण्य एकमेव भगवंत आहे. हे जाणून अहंकार, वाणी, चित्त, शरीर श्री भगवंतास अर्पण करून अनन्यभावाने शरण जाणे ही आत्मनिवेदन भक्ती आहे. आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडले की सहजच ब्रह्मार्पण होते. मानव म्हणून जन्माला आल्यावर मोक्ष मिळवणे हे अंतिम ध्येय असायला हवे. आपल्या मनातील विचार; सुख दुःख चुका प्रत्यक्ष देव ऐकतो असे समजून बोलणे म्हणजेच आत्मनिवेदन होय. मी म्हणजे शुध्द चैतन्य, आनंद हे माझे रूप आहे. मी शिव म्हणजे मंगलमय परब्रह्म स्वरूप आहे, चिदानंदरूप आहे, शिवस्वरूप आहे !!

तर ही अशी नवविधा भक्ती आहे. जी भक्ती ज्याला झेपेल तिचा अंगिकार त्या भक्ताने करावा !!

" श्रीराम जयराम जयजयराम "

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी